सप्टेंबर – २००७

# लेखापरिक्षणांची लुटमारी

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ नुसार प्रत्येक सहकारी संस्थेचे लेखापरिक्षण करण्याची तरतुद आहे. कलम ८१ नुसार ज्या ज्या सहकारी संस्थांना राज्य शासन किंवा शासकीय उपक्रम यांचेकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या हमीसह वित्त सहाय्य देण्यात आले असेल अशा प्रत्येक सहकारी संस्थेच्या बाबतीत आणि शिखर संस्था, राज्य व जिल्हा स्तरावरील संघीय संस्था, जिल्हा मध्यवर्ती बँका, सहकारी साखर कारखाने, नागरी सहकारी बँका, सहकारी सुत गिरण्या, जिल्हा तालुका खरेदी व विक्री संघ आणि राज्य शासन राजपत्रातील अधिसुचनेद्वारे वेळो वेळी विनिर्दिष्ठ करील अशी कोणतीही सहकारी संस्था यांचे बाबतीत निबंधक, **प्रत्येक सहकारी आर्थिक वर्षात निदान एकदा हिशोबांची लेखापरिक्षण करीन** किंवा या बाबतीत त्याने लेखी दिलेल्या सर्व साधारण किंवा विशेष आदेशाद्वारे प्रधिकृत केलेल्या व्यक्ती करवी ती करून घेईल.

वर उल्लेखलेल्या सहकारी संस्थांपेक्षा अन्य प्रकारच्या सहकारी संस्था प्रत्येक सहकारी वर्षात निदान एकदा तरी निबंधकाने ठेवलेल्या लेखापरिक्षक नामांकनातील लेखा परिक्षकाकरवी किंवा इन्स्टिट्युट ऑफ चार्टड अकौंटंट्स ऑफ इंडिया या संस्थेने दिलेले सहकार लेखापरिक्षण प्रमाणपत्र धारण करणाऱ्या एखाद्या सनदी लेखा परिक्षकाकडून सहकारी संस्थांच्या हिशोबाची लेखापरिक्षण करण्याची व्यवस्था करील. परंतु निबंधक कारणे लेखी नमूद करून त्या कारणास्तव अशा कोणत्याही सहकारी संस्थांची कोणत्याही वर्षाची, कोणत्याही वेळी लेखा परिक्षण करू शकेल किंवा करवून घेवू शकेल.

परंतु निबंधकाने अधिसुचनेत केलेल्या कोणत्याही सहकारी संस्थेस निबंधकाने ठेवलेल्या आणि त्यांनी शासकीय राजपत्रात प्रसिध्द केलेल्या प्रमाणित हिशोब तपासणीच्या मालिकेतून निवडलेल्या हिशोब तपासणीकाकडून त्या सहकारी संस्थांच्या हिशोबाची तपासणी करून घेता येईल. आणि या प्रमाणित हिशोब तपासणीच्या व्याखेत खालील व्यक्तींचा समावेश होतो.

१. जी व्यक्ती, सनदी हिशोब तपासणीच्याबाबत (चार्टर्ड अकौंटंट) अधिनियम १९४९ च्या अर्थानुसार सनदी हिशोब तपासणीस असेल.

२. जी व्यक्ती सहकारी संस्थांच्या हिशोब तपासणी संबंधी सरकारी पदविका किंवा सहकार व लेखापालन ( अकौंटंसी) विषयक सहकारी पदविकाधारण करीत असेल अशी व्यक्ती.

३. ज्या व्यक्तीने राज्य शासनाच्या सहकार खात्यात हिशोब तपासणीस म्हणून काम केले असेल आणि त्याचे नाव निबंधकाकडून ठेवण्यात येणाऱ्या व प्रत्येक ३ वर्षात किमान एकदा शासकीय राजपत्रात प्रसिध्द करण्यात येणाऱ्या हिशोब तपासणीच्या नाम मालिकेत समाविष्ठ करण्यात आली असेल अशी व्यक्ती.

वरील सहकार कायद्यातील तरतुदीनुसार आपल्या लक्षात येईल की, महाराष्ट्र शासन, निबंधक, शासकीय लेखापरिक्षक ,चार्टर्ड अकौटंट आणि प्रमाणित लेखा परिक्षक यांच्यामध्ये अगोदर उल्लेख केल्याप्रमाणे त्या सहकारी संस्थांचे वर्षातून किमान एकदा लेखापरिक्षण करण्या संदर्भातील प्रकरण एकमेकांशी अवलंबीत केले आहे. किंबहूना ह्या व्यवस्थेवर त्या सहकारी संस्थांचे लेखापरिक्षण करण्याची वैधानिक जबाबदारी सोपविली आहे. परंतू संपूर्ण राज्यात या लेखापरिक्षणाच्या बाबतीत पूर्ण गोंधळ उडालेला आहे. शासनाची व शासनाने नेमलेल्या सहकारी अधिकाऱ्यांची लेखापरिक्षणाबाबतची भूमिका व धोरण हे सर्व संभ्रमीत आहे.

महाराष्ट्र शासनाने राज्यातील वरील सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षणाच्या संदर्भात निश्चित स्वरूपाचे धोरण आखलेले नाही. आणि **धोरण जर आखले असते तर एका सहकारी संस्थेवर एकापेक्षा जास्त, व काही ठिकाणी तर तीन लेखापरिक्षकांची नियुक्ती झालीच नसती.** एका सहकारी संस्थेवर सहकार आयुक्तांच्या कार्यालयातून व त्याच संस्थेवर विभागीय सहनिबंधकाच्या कार्यालयातून लेखापरिक्षकाची नियुक्ती केल्याची हजारो उदाहरणे राज्यात सर्वश्रृत आहेत. या पाठीमागचे व या अराजकेतेचे नेमके काय कारण आहे ? हे शोधण्याची गरज आहे. ज्या निबंधकांनी अशा प्रकारची लेखापरिक्षकाची नियुक्ती करण्याचे आदेश ज्या सहकारी संस्थांना निर्गमित केले आहे, त्यांची व त्या प्रकरणांची सी. बी. आय. मार्फत जर चौकशी झाली तर अनेकांना तुरूंगाची हवा खावी लागेल, असेच चित्र निर्माण होवू शकते. एवढेच नव्हे तर एक दिवस हे अति बेशिस्तीचे व निर्ढावलेल्या मनोवृत्तीचे लांगुल चालन मोडावेच लागेल.

शासनाने राज्यशासनाच्या सहकार खात्यात हिशोब तपासणीस म्हणून तसेच चार्टर्ड अकौंटंट व प्रमाणित लेखापरिक्षकांच्या नावांची शासकीय राजपत्रात प्रसिध्द केलेली यादी महाराष्ट्रातील जनतेसमोर सर्वांना सहजपणे उपलब्ध होईल ह्या पध्दतीने तारखांसह प्रथम एकत्रित जाहीर करावयास पाहिजे. आणि जर हे झाले तर कोणाचे काय अधिकार व कोण कसे वागले हे महाराष्ट्रातील जनतेसमोर सहजपणे उघड होईल. राज्य शासनाने सहकार खात्यातील हिशोबतपासणीस म्हणून नेमलेल्या व्यक्तींना लेखापरिक्षणाचे काम देण्याच्या ऐवजी चार्टर्ड अकौटंट व **प्रमाणित लेखापरिक्षकांना लेखापरिक्षणाचे काम अधिकाराचा स्वैराचार करून कशासाठी दिले ?** याचे उत्तर मिळेल. सी. बी. आय. या यंत्रणेकडे हे प्रकरण गेलेच पाहिजे किंबहूना ते देण्यासाठी जाणीवपुर्वक पावले उचलली पाहिजेत. चार्टर्ड अकौटंट आणि प्रमाणित लेखापरिक्षकांच्या मार्फत लेखापरिक्षण करण्यासाठी देण्यात आलेल्या संस्था किती ? कशाच्या आधारे व कोणास ? हे उघड होणार आहे. ज्या सहकारी संस्थांकडून लेखापरिक्षण शुल्क उदा. जर १० हजार रूपये मिळणार असतील तर, त्या चार्टर्ड अकौंटंट किंवा प्रमाणित लेखापरिक्षकांना संबंधित निबंधकास किमान ३० टक्के रक्कम म्हणजेच ३ हजार रूपये दिल्याशिवाय नियुक्ती आदेश (ऑर्डर) मिळत नाही, अशीच चर्चा राज्यात उघडपणे होत आहे. त्यामुळे चार्टर्ड अकौंटंट व प्रमाणित लेखापरिक्षक ह्यांना सुध्दा त्यांनी केलेल्या **लेखापरिक्षणाचा आर्थिक मोबदला व कष्टाचे मोल पूर्ण मिळत नाही.**व त्यांचेही आर्थिक शोषण होते, आणि याचीच सी. बी. आय. ने चौकशी केली पाहिजे.

अत्यल्प लेखा परिक्षण शुल्क मिळणाऱ्या सहकारी संस्था चार्टर्ड अकौंटंट व प्रमाणीत लेखापरिक्षकांना का देत नाहीत ? आणि **मोठ्या रक्कमांचे लेखा परिक्षण शुल्क मिळणाऱ्या संस्थांचे लेखापरिक्षणाचे काम शासनाच्या लेखा परिक्षकास का दिले जात नाही ?** हाच खरा प्रश्न आहे. शासनाचे उत्पन्न म्हणजेच

लेखापरिक्षणाद्वारे मिळणारा महसूल जाणीवपूर्वक बुडवून लेखापरिक्षण चार्टर्ड अकौंटंट व प्रमाणित लेखापरिक्षकांना कशासाठी द्यायचे ? हाच खरा महत्वाचा व ऐरणीचा मुद्दा आहे. उत्तर व स्पष्टीकरण राज्यात कोणाच्याही लक्षात येईल.

राज्यामध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, जिल्हा मध्यवर्ती बँका, नागरी सहकारी बँका व ५० लाखांपुढील सर्व पतसंस्था, सुत गिरण्या, जिल्हा व तालुका खरेदी व विक्री संघ या थेट आर्थिक व्यवहार करणाऱ्या संस्थांचे लेखापरिक्षण शासकीय लेखापरिक्षकांच्या माध्यमातुन करण्याचे धोरण शासन का जाहीर करीत नाही ? यातच सर्व काही आले. याप्रकरणी राज्यात परिस्थीती **''तेरीभी चूप मेरेभी चूप''** अशी चालू आहे. महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचीव, सहकार सचीव व सहकार आयुक्त याप्रकरणी शासकीय अधिकारी म्हणुन का पावले उचलीत नाही ? व शासनाचे उत्पन्न बुडविण्यासाठी ज्या माध्यमातून व हेतूने लेखा परिक्षकांच्या बाबतीत सोईनुसार निर्णय लादले जातात, ते थांबविण्यासाठी त्वरीत कार्यवाही होणे आवश्यक आहे. व महाराष्ट्र राज्याचे उत्पन्न जे लोक कुठलेही कारण दाखवून बुडविण्यासाठी विविध अधिकारांचा गैरवापर करतात, त्यांना वठणीवर आणले पाहिजे. अन्यथा कायद्याने व **जे सहज उत्पन्न नियमितपणे शासनास मिळू शकते, ते बुडविण्याचा हेतू काय ?** याचा जाहीर जाब संबंधितांना विचारण्याची मानसिकता सर्वांनी स्विकारली पाहिजे.

या अग्रलेखाद्वारे राज्यातील त्या सहकारी संस्था, त्यांची सुरक्षितता व राज्य शासन यांना एकत्रित आणून, न्याय मिळविणेसाठी व हे **राज्य कोणाला लुबाडण्यासाठी नाही हे कृतीने दाखवयाला पाहिजे.** आणि त्यासाठी या अगोदर झालेला वरिल प्रकार व त्यांची पाळेमुळे व ज्यांनी हे आदेश करविले व सहकारी संस्थांना व राज्य शासनाच्या उत्पन्नाला नाडले, त्यांना सी. बी. आय. च्या चौकशीतूनच शिक्षा होऊ शकेल आणि आम्ही तशी मागणी या पत्राद्वारे करीत आहोत.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**